# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

### मा. पालकमंत्री यांची महाविद्यालयास सदिच्छा भेट

प्रभात | पुणे जिल्हा | बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०१५

# राजगुरू महाविद्यालयात हुतात्म्यास मानवंदना

## पालकमंत्र्यांसह लोकप्रतिनिधींची उपस्थिती : सर्वपक्षीय नेत्यांनी घेतला समस्यांचा आढावा

राजगुरूनगर, दि. २५ (प्रतिनिधी) - हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्याजयंतीनिमित्तानेयेथीलहुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील हुतात्मा राजगुरू स्मारकाला सोमवारी (दि. २४) अभिवादन करण्यात आले. यावेळी एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी राजगुरू स्तंभास मानवंदना दिली. स्मारकातील थोर क्रांतिकारक हुतात्मा भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

स्वातंत्र्य लढ्यातील थोर क्रांतिकारक हुतात्मा राजगुरू यांच्या जयंतीनिमित्ताने जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश बापट, जलसंपदा राज्यमंत्री विजय शिवतारे, माजीमंत्री दिलीप वळसेपाटील राजगुरूनगर येथे उपस्थित होते. हुतात्मा राजगुरू यांना अभिवादन केल्यानंतर येथील राजगुरू महाविद्यालयास त्यांनी भेट दिली. महाविद्यालयातील हुतात्मा स्मारक व महाविद्यालयास भेट देऊन पाहणी केली. त्यांच्या समवेत खेडचे आमदार सुरेश गोरे, जुन्नरचे आमदार शरद सोनवणे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, नगराध्यक्ष बापूसाहेब थिगळे, नानासाहेब टाकळकर, कोंडीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, माऊली कड़े, प्राचार्य डॉ एस. बी. पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते. लोकप्रतिनिधींनी महाविद्यालयातील उपक्रमांचा आणि समस्यांचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांची वाढती संख्या, विनाअनुदानित तुकड्यांचा प्रश्न, अनुदानित कर्मचाऱ्यांच्या भरतीवरील बंदी या संदर्भातील प्रश्नांबाबत संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील यांनी माहिती दिली. त्यावर दीर्घकाळ चर्चा करण्यात आली. संस्थेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करून जलसंपदामंत्री विजय शिवतारे यांनी संस्थेचे कौतुक केले. तर संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीसाठी जी मदत लागेल ती करण्याचे आश्वासन पालकमंत्री गिरीश बापट यांनी दिले.

तालुक्यात प्रथमच भाजपचे मंत्री गिरीश बापट, शिवसेनेचे मंत्री विजय शिवतारे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजीमंत्री दिलीप वळसेपाटील, मनसेचे आमदार शरद सोनवणे, शिवसनेचे खेडचे आमदार सुरेश गोरे एकत्र आल्याने विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये कुतूहल निर्माण झाले होते. वेगवेगळ्या राजकीय विचारसरणीचे नेते एकत्र आल्याने आणि त्यांच्याकडून विद्यार्थ्यांच्या, नागरिकांच्या समस्या प्रथमच समजून घेतल्याने त्या सोडविण्यासाठी प्रयत्न होतील अशा अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केल्या आहेत.

### तालुक्यातील प्रश्न सुटण्याची चर्चा...

हुतात्मा राजगुरु यांच्या जयंतीनिमित्ताने राजगुरु महाविद्यालयात सर्वपक्षीय नेते एक आले होते. यावेळी तालुक्यातील विविध समस्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यात मंत्र्यांनी दिलेली आश्वासने किती पूर्ण होतात याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. त्यातच खेड तालुक्यातील रखडलेले प्रश्न मार्गी लागतील अशी नागरिकांमध्ये चर्चा सुरु होती. याशिवाय शिक्षकांचे प्रश्न मार्गी लागणार का?, स्थानिकांचे प्रश्न मार्गी लागणार का? या चर्चेत दंग झाले होते.



राजगुरूनगर: हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील हुतात्मा स्मारकास राजगुरुंच्या जयंतीनिमित्त पालकमंत्री गिरीश बापट, जलसंपदामंत्री विजय शिवतारे, आमदार सुरेश गोरे, शरद सोनवणे यांनी भेट दिली.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख